**दिनविशेष...**

१६७४ : छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री राजमाता जिजाबाई यांचा पाचाड येथे स्वर्गवास.

१८९५ : महाराष्ट्र सेवक, थोर समाजसुधारक व फर्ग्युसन कॉलेज पुणेचे प्राचार्य गोपाळ गणेश आगरकर यांचे निधन.

१९६७ : चीनने पहिल्या हायड्रोजन बॉम्बचा स्फोट केला.

# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ८१,७९६.१५ | +६७७.५५(०.८४%) |
| डॉलर | ₹ ८६.०२ | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३६ | २६ |
| दिल्ली | ३३ | २६ |
| मुंबई | ३२ | २७ |
| नागपूर | ३५ | २७ |
| पुणे | ३० | २४ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव | मंगळवार, दि. १७ जून २०२५ | वर्ष १ ले | अंक २२० | किंमत : ५ रु. | पाने ४


**सुविचार**

पोहरा झुकल्याशिवाय विहिरीतलं पाणी पोहऱ्यात जात नाही.

सुर्योदय - सुर्यास्त

स.-५:४६ संध्या-७:१०

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,०१,५१०/- १,०९,९००/-

**केळी भाव**

नवती : १५८१ ते १६००

पिल बाग : ९८० ते ९००

कांदे बाग : ----

## थोडक्यात

### मुंबईत पावसाची संततधार सुरुच

**मुंबई ।** मुंबईसह उपनगरात रात्रभर पावसाची बॅटिंग सुरु आहे. मुंबई शहर आणि उपनगरात पावसाची संततधार सुरु आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुंबईतील हिंदमाता, सायन, दादर यांसारख्या सखल भागांत रस्त्यांवर पाणी साचले आहे. त्यामुळे नागरिकांना साचलेल्या पाण्यातून वाट काढावी लागत आहे. तर दुसरीकडे मुंबईची लाईफलाईन असलेली मुंबई लोकल उशिराने सुरु आहे. मुंबईतील पश्चिम, मध्य आणि हार्बर रेल्वेची वाहतूक १० ते १५ मिनिटे उशिराने सुरु आहे. त्यासोबतच ईस्टर्न हायवे, वेस्टर्न हायवेसह सर्व वाहतूक संथ गतीने सुरू आहेत. रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि जलमय रस्त्यांमुळे चाकरमान्यांना कामावर पोहोचण्यास उशीर होण्याची शक्यता आहे.

### पालखीवर 'एआय' ठेवणार लक्ष

**पुणे ।** संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखी दरम्यान पुणे पोलिसांनी गर्दीच्या नियोजनासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. वारकऱ्यांची नोंद, वाहनांची संख्या आणि गर्दीच्या व्यवस्थापनासाठी पोलीस एआय तंत्रज्ञानाचा वापर करणार आहेत.

राज्यभरातील वारेकऱ्यांचे लक्ष लागलेल्या आळंदी येथील संत ज्ञानेश्वर महाराज आणि देहू येथील संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे १९ जून रोजी पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान होणार आहे. लाखो वारकरी या भक्तीपूर्ण सोहळ्यात दरवर्षी सहभागी होतात. त्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी गर्दीच्या नियोजनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. वारकऱ्यांची नोंद, वाहनांची संख्या आणि गर्दीच्या व्यवस्थापनासाठी पोलीस एआय तंत्रज्ञानाचा वापर करणार आहेत.

# गृहमंत्रालयाकडून जातनिहाय जनगणनेची अधिसूचना जारी

**● केंद्र सरकारची २०२७ च्या जनगणनेसाठी औपचारिक घोषणा**



● देशात प्रथमच जातनिहाय जनगणना

**दोन टप्प्यांत जनगणना**

● **पहिला टप्पा:** ऑक्टोबर २०२६ मध्ये लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू-काश्मीरमधील बर्फाच्छादित भागांसाठी. संदर्भ तारीख: १ ऑक्टोबर २०२६.

● **दुसरा टप्पा:** मार्च २०२७ मध्ये देशातील उर्वरित भागांसाठी. संदर्भ तारीख: १ मार्च २०२७....पहिल्या टप्प्यात घरांची यादी आणि मोजणी होईल, तर दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक व्यक्तीची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, आणि जातनिहाय माहिती गोळा केली जाईल.

**वृत्तसंस्था । नवी दिल्ली**

**भारत सरकारने २०२७ च्या जनगणनेसाठी औपचारिक घोषणा करत केंद्रीय गृहमंत्रालयाने राजपत्र अधिसूचना जारी केली आहे. यासह देशातील जातनिहाय जनगणनेची प्रक्रिया अधिकृतपणे सुरू झाली आहे. २०११ नंतरची ही पहिलीच जनगणना असून, ती दोन टप्प्यांत आणि डिजिटल पद्धतीने होणार आहे.**



विशेष म्हणजे, यावेळी नागरिकांना स्वनोंदणीचा (सेल्फ-एन्युमरेशन) खास पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आह. ज्यामुळे जनगणना प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुलभ होणार आहे. रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या सेल्फ-एन्युमरेशन पोर्टलद्वारे नागरिक स्वतःची आणि कुटुंबाची माहिती ऑनलाइन नोंदवू शकतील.

गृह मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार, २०११ नंतर देशात पहिल्यांदाच जनगणना होणार आहे. ही जनगणना दोन टप्प्यात होणार आहे. पहिल्या टप्पा ऑक्टोबर २०२६ तर दुसरा टप्पा मार्च २०२७ दरम्यान पार पडणार आहे. पहिल्या टप्प्यात लडाख आणि आजूबाजुच्या प्रदेशात तर दुसऱ्या टप्प्यात देशातील उर्वरित भागात जनगणना होणार आहे, अशी माहिती गृहमंत्रालयाकडून देण्यात आली आहे.

**जनगणना २०२७, प्रमुख वैशिष्ट्ये**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितले की, ही जनगणना स्वातंत्र्यानंतरची आठवी आणि एकूण सोळावी जनगणना आहे. यंदाची जनगणना अनेक बाबतीत ऐतिहासिक ठरणार आहे.

**जनगणनेचे महत्त्व**

प्रथमच जातनिहाय माहिती संकलनामुळे सामाजिक समावेशन आणि धोरण निर्मितीला चालना मिळेल. निवास, मालमत्ता, सुविधा, आणि सामाजिक-आर्थिक माहिती यांच्या आधारे सरकारला शिक्षण, आरोग्य, आणि पायाभूत सुविधांच्या योजना आखता येतील. मोबाईल ॲप्लिकेशन आणि स्वनोंदणी पोर्टलमुळे डेटा संकलन जलद आणि अचूक होईल. क्षेत्रनिहाय लोकसंख्येच्या वाढीचा डेटा विकासाच्या प्राधान्यक्रम ठरवण्यात मदत करेल.

**स्वनोंदणी; नागरिकांसाठी खास सुविधा**

यंदाच्या जनगणनेत सेल्फ-एन्युमरेशन पोर्टल हा सर्वात मोठा बदल आहे. यामुळे नागरिकांना खालीलप्रमाणे फायदे होणार आहेत.

घरी बसून ऑनलाइन माहिती भरता येईल. सर्वेक्षकांवर अवलंबून राहण्याची गरज कमी होईल. डेटा थेट डिजिटल प्लॅटफॉर्मवर नोंदवला जाईल, ज्यामुळे चुका टाळता येतील. नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढेल.

## दर्शनापूर्वी गोदावरी नदीत स्नानाला गेलेल्या एकाच कुटुंबातील ५ तरुणांचा बुडून मृत्यू

**वृत्तसंस्था । नांदेड**

तेलंगणातील निर्मल जिल्ह्यातील श्री सरस्वती देवी मंदिर, बासर येथे रविवारी (१५ जून २०२५) घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. हैदराबादच्या चिंतल बाजार येथील एकाच कुटुंबातील १८ जण मंदिरात दर्शनासाठी आले होते.

दर्शनापूर्वी गोदावरी नदीत स्नानासाठी उतरले असता, पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने पाच तरुणांचा बुडून मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना नांदेड जिल्ह्यालगत तेलंगणातील निर्मल जिल्ह्यात घडली. मुसळधार पावसामुळे गोदावरी नदीचा प्रवाह तीव्र झाल्याने हा अपघात घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

**नेमकं काय घडलं?**

हैदराबादच्या चिंतल बाजार येथील एक कुटुंब मूळचे राजस्थानचे आहेत. १८ जणांचा समूह श्री सरस्वती देवी मंदिरात दर्शनासाठी आला होता. मंदिरात दर्शनापूर्वी धार्मिक विधींसाठी हे कुटुंब गोदावरी नदीत स्नानासाठी उतरले. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, या तरुणांना नदीच्या पाण्याच्या खोलीचा आणि प्रवाहाचा अंदाज आला नाही. नकळत ते खोल पाण्यात गेले आणि बुडू लागले. कुटुंबातील इतर सदस्यांनी आणि स्थानिकांनी (पान २ वर)


## 'नाशिकसाठी जे करायचे ते मी करेल, या वादात नाही पडायचं : छगन भुजबळ

**वृत्तसंस्था । नाशिक**

नाशिक जिल्हा पालकमंत्रिपदासाठी मी कुठेही आग्रह धरलेला नाही. मला या वादात पडायचं नाही, मी खूप इच्छुक आहे असं नाही. नाशिकसाठी जे करायचे ते मी करत राहील', असे सूचक वक्तव्य अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केल्याने नाशिकच्या पालकमंत्री पदाचा तिढा अजूनच वाढवला आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी जातीचे राजकारण केल्याचा आरोप माजी खासदार इम्तियाज जलील यांनी केला होता. याबाबत विचारले असता भुजबळ म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांनी कधीही जातीचे राजकारण केले नाही. त्यांनी सर्वच जातीच्या लोकांना न्याय दिला. माझ्यासारख्या कार्यकर्त्याला त्यांनी नगरसेवक म्हणून निवडून आणले, महापौर केले. भविष्यात उद्धव आणि राज हे एकत्र आले तरी निश्चित बळ वाढेल, परंतु ते (पान २ वर)

## इंद्रायणीवरील पूल कोसळून बापलेकाचा मृत्यू, आई गंभीर जखमी



**वृत्तसंस्था । पुणे**

**तळेगावजवळील कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील लोखंडी पूल रविवारी सायंकाळी कोसळला. या दुर्घटनेत अनेक पर्यटक नदीत पडून वाहून गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यापैकी चौघा जणांचा मृत्यू झाला असून इतरांचा शोध सुरू आहे. या पुलावरून पडल्याने सुमारे ५० पर्यटक जखमी झाले असून, त्यापैकी पाच ते सहा जणांची प्रकृती गंभीर आहे.**

मृतांमध्ये सहा वर्षांचा चिमुकला आणि त्याच्या वडिलांचाही समावेश आहे. रोहित माने आणि विहान माने असे मृत्यू झालेल्या बापलेकाचे नाव आहे. तर चंद्रकांत साठले आणि अन्य एका व्यक्तीचा देखील यात मृत्यू झालेला आहे. विहानच्या आजीने आपल्या नातवाच्या शोधासाठी सर्वांसमोर पदर पसरला होता, मात्र दुर्दैवाने नातू आणि जावई अशा दोघांनाही प्राण गमवावे लागले.

याबाबत प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, रविवार असल्याने राज्यभरातून अनेक पर्यटक कुंडमळा येथे फिरण्यासाठी आले होते. रोहित माने, विहान माने, त्यांची पत्नी आणि सासूबाई असे कुटुंबीय आले होते. पुलावर ते उभे असताना काही दुचाकीस्वार त्या ठिकाणी आले. त्यामुळे अतिभाराने पूल कोसळून काहीजण पुरात वाहून गेल्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

**● दोषींवर मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करा : हर्षवर्धन सपकाळ**

**मुंबई** – पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून झालेले मृत्यू हे सरकारच्या हलगर्जीपणाने घेतलेले बळी आहेत. कुंडमळा येथे पावसाळ्यात शेकडो पर्यटक येतात याची माहिती असताना तो धोकादायक पूल खुला का ठेवला? असा प्रश्न विचारून हे सरकारने घेतलेले बळी आहेत. जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, कुंडमळा येथील लोखंडी पूल कमकुवत झाला होता. (पान २ वर)

## शाळेच्या पहिल्या दिवशी अजित पवारांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

**वृत्तसंस्था । पुणे**

**पुणे** : शाळा प्रवेशोत्सव २०२५ कार्यक्रमाअंतर्गत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी शाळा सुरु होण्याच्या पहिल्याच दिवशी दौंड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा आलेगाव पुनर्वसन या शाळेत विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत केले.



यावेळी गटविकास अधिकारी महेश ढोके, गटशिक्षणाधिकारी संजय महाजन, विस्तार अधिकारी शरीफा तांबोळी, केंद्र प्रमुख आशा धाडगे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वीरधवल जगदाळे आदी उपस्थित होते.

आज शालेय जीवनातील आठवणीला उजाळा मिळाला, असे सांगून अजित पवार म्हणाले, भावी पिढी घडविण्यासाठी विद्यार्थ्यांना आधुनिक, दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देण्यासोबतच सर्व शाळांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे ही राज्य शासनाची नैतिक जबाबदारी आहे.

त्यादृष्टीने विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट उपलब्ध करुन देण्यात येत आहेत, याकरिता राज्य शासन शिक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च करीत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण घेतांना अडीअडचणी येणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात येत आहे. शिक्षकानेही विद्यार्थ्यांना दर्जेदार ज्ञान देण्याच्यादृष्टीने अध्यापन केले पाहिजे.

राज्य शासनाने १० कोटी वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एका वृक्षाची लागवड करून त्यांचे (पान २ वर)

## इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनेईच्या हत्येचा इस्त्रायलने रचला कट

**● इस्त्रायलने खामेनेईंची हत्येचा प्रस्ताव अमेरिकेसमोर होता ठेवला ; ट्रम्प यांच्या निर्णयाने 'गेम चेंज'**

**वृत्तसंस्था । मुंबई**

इस्त्रायल आणि इराणमधील संघर्ष अद्यापही सुरूच आहे. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा मारा केला जात आहे आणि यामुळे दोन्ही देशांमधील मृताचा आकडाही वाढत आहे. इराण आणि इस्रायलमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेतून एक मोठा खुलासा समोर आला आहे.



**● अमेरिकेचा इराणला इशारा**

याशिवाय ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर म्हटलं की, आमच्यावर कोणत्याही प्रकारचा हल्ला झाला तर अमेरिकेच्या सैन्याची पूर्ण ताकद आणि शक्ती इराणवर बरसेल. जे पहिलं कधी पाहिलं गेलं नव्हतं ते घडेल. इराण आणि इस्त्रायल यांच्यात शांतता करार शक्य आहे. आपण सजपणे एका करारापर्यंत पोहोचू शकतो, या रक्तरंजीत संघर्षाला संपवू शकतो, असं ट्रम्प म्हणाले.

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच इस्रायलच्या एका महत्त्वाच्या योजनेला नकार दिला होता. ज्यामध्ये इराणचे सर्वोच्च नेता अयातुल्ला अली खामेनेई यांना ठार मारण्याची योजना आखण्यात आली होती. इस्रायलने खामेनेईंना लक्ष्य करण्याचा प्रस्ताव अमेरिकेसमोर ठेवला होता. मात्र अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हा विचार नाकारला, त्यामुळे इस्त्रायलला इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्या हत्येची योजना रद्द करावी लागली.

एका वरिष्ठ अमेरिकेच्या अधिकाऱ्यानं म्हटलं की, इराणनं आतापर्यंत एखाद्या अमेरिकन व्यक्तीला मारलं आहे का? नाही, मग तोपर्यंत इराणच्या राजनैतिक नेतृत्त्वाला लक्ष्य करण्याची चर्चा करणार नाही. मात्र इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी अमेरिकन अधिकाऱ्यांचा हा दावा फेटाळला आहे. ट्रम्प यांचे हे विधान एका वरिष्ठ अमेरिकी प्रशासनिक अधिकाऱ्याने रॉयटर्सला दिले आहे. हे विधान इराण आणि इस्रायल (पान २ वर)

## आसिफ मुनीरला निमंत्रणच नव्हते; व्हाईट हाऊसने दिले स्पष्टीकरण

**वृत्तसंस्था । न्यूयॉर्क**

अमेरिकेत झालेल्या लष्करी संचलनासाठी पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल आसिफ मुनीर यांना निमंत्रण दिल्याच्या वृत्ताचे व्हाईट हाऊसने खंडन केले आहे. या संचलनासाठी कोणत्याही विदेशी लष्करी नेतृत्वाला निमंत्रण देण्यात आलेले नव्हते. जनरल आसिफ मुनीर यांना निमंत्रण दिल्याचे वृत्त पुर्णपणे खोटे आहे, असे व्हाईट हाऊसच्या पदधिकाऱ्याने म्हटले आहे.



ब्रिटीश वसाहतवादी राज्याशी सामना करण्यासाठी अमेरिकेच्या लष्कराची स्थापना १४ जून १७७५ रोजी झाली होती. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या वाढदिवसाच्याच दिवशी आणि लष्कर स्थापनेला २५० वर्षे पुर्ण होत असल्याच्या निमित्ताने या भव्य लष्करी संचलनाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने जगासमोर आपल्या सामर्थ्याचे प्रदर्शन करण्यासाठी ट्रम्प यांनी या संचलनाचे आयोजन केले होते. मात्र या संचलनाला (पान २ वर)

# आपला खान्देश

epaper.shauryamarathi.com | जळगाव । मंगळवार, दि. १७ जून २०२५ | २

## संपादकीय

### द अनटोल्ड स्टोरी ऑफ जालियनवाला बाग

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतीय स्वातंत्र्यलढ्यात एकाहून अधिक त्यागी आणि ज्ञानी व्यक्तींनी जबरदस्त योगदान दिलेले दिसून येते. यातील एक वेगळं, फारसं प्रसिद्ध नसलेलं पण फार महत्त्वाचं नाव म्हणजे सर सी. शंकरन नायर. हे नाव उच्चारल्यावर डोळ्यांसमोर येते ती १३ एप्रिल १९१९ रोजी पंजाब प्रांतातील अमृतसर शहरातल्या जालियनवाला बागमध्ये घडलेल्या हत्याकांडाची. आता गेलेल्या एप्रिल महिन्यात या घटनेला १०६ वर्षं पूर्ण झाली. त्याच्या आसपास म्हणजे १८ एप्रिल २०२५ रोजी सी. शंकरन नायर यांच्या जीवन आणि कार्याबद्दल चित्रपट प्रदर्शित झाला. केसरी चॅप्टर टू : द अनटोल्ड स्टोरी ऑफ जालियनवाला बाग या चित्रपटाचा तेलुगू अवतार २३ मे रोजी प्रदर्शित झाला. अशा स्थितीत हे सी. शंकरन नायर कोण आणि त्यांच्या जीवनावर सिनेमा यावा असं त्यांच्या जीवनात काय घडलं, असे प्रश्न मनात आल्यावाचून राहात नाही. त्यांची कन्या लेडी माधवन नायर यांनी १९६६ साली द ऑटोबायोग्राफी ऑफ सर सी. शंकरन नायर पुस्तक प्रसिद्ध केले.सी. शंकरन नायर यांच्या योगदानाबद्दल जाणून घेण्याअगोदर अगदी थोडक्यात जालियनवाला बागेतील घटनेबद्दल माहिती असणे गरजेचे आहे. पहिले महायुद्ध १९१८ साली संपले. या युद्धातभारतीय सैनिकांनी अलौकिक पराक्रम गाजवून इंग्रजी साम्राज्याला विजय मिळवून दिला. त्यामुळे आता इंग्रज सरकार आपल्या स्वातंत्र्याबद्दलच्या मागण्यांचा सहानुभूतीने विचार करेल अशी भारतीयांची अपेक्षा होती. या अपेक्षांऐवजी त्यांच्यासमोर आला १९१९ सालचा काळा कायदा ज्याला रौलेट कायदा असे म्हणतात. सर सिडनी रौलट यांच्या अध्यक्षतेखालच्या समितीने असा कायदा करण्याची सूचना केली होती. म्हणून या कायद्याला रौलट कायदा म्हणतात. या कायद्यातील तरतुदी इतक्या भयानक होत्या की महात्मा गांधींनी या विरोधात देशव्यापी सत्याग्रह सुरू केला.या देशव्यापी निषेधाचा भाग म्हणून पंजाब प्रांतातील अमृतसर शहरातील जालियनवाला बागेत १९ एप्रिल १९१९ रोजी जाहीरसभा आयोजित केली होती. या सभेसाठी शेकडो स्त्री-पुरूष गोळा झाले होते. जालियनवाला बागेची रचना अशी होती की ही बाग तिन्ही बाजूंनी बंदिस्त आणि येणाऱ्या -जाण्यासाठी एक छोटीशी वाट आहे. भारतीय समाजात भीती निर्माण व्हावी या हेतूने इंग्रज अधिकार्यांनी या निःशस्त्र लोकांवर अंदाधुंद गोळीबार केला. यात ३७९ ते १५०० निरपराध लोक मारले गेले. या घटनेचे देशभरच नव्हे तर जगभर पडसाद उमटले. रवींद्रनाथ टागोरांनी त्यांना इंग्रजांनी दिलेली सर ही पदवी निषेध म्हणून परत केली. आता या प्रकरणाशी केरळ राज्याचे रहवासी असलेल्या सर सी. शंकरन नायर यांचा संबंध कसा येतो? यासाठी नायर यांच्या जीवनातील काही तपशील थोडक्यात माहिती पाहिजे. नायर यांनी मद्रास येथून वकिलीची पदवी मिळवली होती. महाविद्यालयीन जीवनापासून बुद्धीची चमक दाखवायला सुरुवात केली होती. त्यांनी मद्रास उच्च न्यायालयातील नामवंत इंग्रज वकील सर होरेशियो शेफर्ड यांचे मदतनीस म्हणून कामाला सुरुवात केली. सर शेफर्ड नंतर मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती झाले. या दरम्यान नायर यांचा एक हुशार वकील म्हणून नावलौकिक व्हायला लागला होता. एकदा एक इंग्रज न्यायमूर्ती हॉलोवे म्हणाले इंग्रजांवर कधी कोणी राज्य केले नाही.तेव्हा नायर यांनी ताबडतोब फ्रेंचांनी कसं इंग्रजांचा पराभव करून त्यांना गुलाम केले होते, याची माहिती सादर केली. नायर यांना दूरदृष्टी होती. त्यांना फक्त राजकीय स्वातंत्र्य अपेक्षित नव्हते तर सामाजिक- आर्थिक स्वातंत्र्यसुद्धा अपेक्षित होते. त्या काळच्या देशप्रेमी वकीलांप्रमाणे नायर एका बाजूला वकिली करत होते तर दुसरीकडे स्वातंत्र्यलढ्यात तसेच सामाजिक सुधारणांच्या कार्यात व्यस्त होते. १८९७ साली ते अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष झाले. तोपर्यंत काँग्रेसच्या इतिहासातील सर्वात तरुण अध्यक्ष असे त्यांचे वर्णन केले जात होते. त्यांचे वकिलीतील कौशल्य बघून इंग्रज सरकारने त्यांना १९०८ साली मद्रास उच्च न्यायालयात न्यायमूर्तिपदी नेमले. त्यांनी अनेकदा आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांचा पुरस्कार केलेला दिसून येतो. त्यांना भारताला स्वयंनिर्णयाचा अधिकार असावा असे वाटत होते. १९१९ सालच्या भारत सरकार कायद्याने आपल्या देशात प्रांतांच्या पातळीवर द्विदल पद्धत सुरू केली. मात्र एप्रिल १९१९ मध्ये घडलेल्या जालियानवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी व्हाइसरॉयच्या कायदेमंडळाचा राजीनामा दिला.

# वीज पडून चिमुकलीचा मृत्यू; आई गंभीर जखमी

**● निंबीपाडा येथील घटना; जखमींवर ग्रामीण रुग्णालयात उपचार**

**प्रतिनिधी । अक्कलकुवा**

**तालुक्यातील मोलगी येथील निंबीपाडा येथे दि. १४ जून रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास वीज पडून एका ९ वर्षांच्या चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला असून, तिची आई गंभीर जखमी झाली आहे.**

या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याबाबत माहितीनुसार, मोलगीचा निंबीपाडा येथील दिलीप टेडगा वसावे यांच्या राहत्या घरात ही घटना घडली. घटनेच्या वेळी मुलगी माया दिलीप वसावे (वय ९) ही लाकडी खांबाजवळ बसून जेवण करत होती, तर तिची आई रमाबाई दिलीप वसावे (वय-३७) घरात हजर होत्या. गावात जोरदार पाऊस



आणि विजांचा कडकडाट सुरू असतानाच अचानक घरावर नैसर्गिक वीज कोसळली.

या दुर्घटनेत मायाला विजेचा जोरदार धक्का लागल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. तर, रमाबाई यांनाही विजेचा धक्का लागल्याने त्या जखमी झाल्या आहेत. त्यांना तातडीने मोलगी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या घटनेची माहिती मिळताच मोलगी पोलिसांनी तातडीने बी.एन.एस.एस कलम १९४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस सब इन्स्पेक्टर सागर गाडीलोहार करत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

# चिनोदा गावात अतिसाराची लागण

**● ४० ते ५० ग्रामस्थ बाधित; आरोग्य विभागाचे पथक दाखल**

**प्रतिनिधी । तळोदा**

तालुक्यातील चिनोदा येथे अतिसाराची साथ पसरली असून ५० पेक्षा अधिक जणांना या आजाराची लागण झाली आहे. नागरिकांना जुलाब, उलट्या, ताप व अशक्तपणाच्या तक्रारी असून रुग्णांवर गावातील मंगल कार्यालयात, तळोदा उपजिल्हा रुग्णालय व खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीला गळती लागल्यामुळे साथ पसरल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, एका २० वर्षीय मुलीची प्रकृती खालावल्याने तिला उपचारासाठी नंदुरबार येथे जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

चिनोदा येथील धानका गल्लीत जलवाहिनीला गळती आहे. त्यामुळे डायरियाची साथ पसरली असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मागील दोन दिवसांपासून धानका गल्लीत राहणाऱ्या नागरिकांना पोटदुखी,

मळमळ, उलट्या व जुलाब याचा त्रास होत होता. मात्र, शनिवारी अनेकांना त्रास जाणवूलागल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी आरोग्य



विभागाशी संपर्क केल्यानंतर आरोग्य विभागाचे पथक गावात दाखल झाले व त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन गावकऱ्यांच्या मदतीने गावातील मंगल कार्यालयात त्रास जाणवणाऱ्या रुग्णांवर प्राथमिक उपचार सुरू केले. त्यानंतर काहींना खासगीरुग्णालयात दाखल केले, तर काहींना तळोदा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एका २० वर्षीय मुलीची प्रकृती खालावली असून तिला नंदुरबार जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे. १५ ते २० जणांवर गावातील मंगल कार्यालयातच औषधोपचार सुरू आहेत.

चिनोदा गावातील धानका गल्ली परिसरात मागील चार दिवसांत चार जणांचा मृत्यू झाला आहे. यातील मृत पावणारे वयोवृध्द असले तरी त्यांना देखील उलटया व जुलाबाचा त्रास असल्याचे त्यांच्या त्यांच्या नातेवाईकांकडून सांगण्यात आले आहे. मात्र आरोग्य विभागाला याबाबत विचारले असता त्यांच्या वृध्दापकाळाने मृत्यू झाल्याचे आरोग्य विभागाच्या वतीने सांगण्यात आले. मृतांमध्ये सरूबाई सख-राम नाईक (वय ७०) चंपाबाई चतुर धानका (वय ६८), प्रभू करसन धानका (वय ५०) व रूबा छगन धानका (वय ६२) यांचा समावेश होता.

## शिवसेनेतर्फे विमान दुर्घटनेतील मृतांना श्रद्धांजली

**प्रतिनिधी । नंदुरबार**

अहमदाबाद येथील विमान घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना शिवसेना उबाठा पक्षामार्फत सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी मेणबत्ती पेटवून श्रद्धांजली देण्यात आली. येथील शिवसेनेच्या जिल्हामहानगर प्रमुख कार्यालयात सायंकाळी मेणबत्ती पेटवून सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी उपजिल्हाप्रमुख अर्जुन मराठे,जिल्हामहानगरप्रमुख पंडित माळी, जिल्हा संघटक सुनील सोनार, तालुकाप्रमुख रमेश पाटील, उपतालुकाप्रमुख सुनील पवार, शहरसंघटक भक्तवत्सल सोनार, उपमहा नगरप्रमुख इम्तियाज कुरेशी, माजी उपशहर प्रमुख खंडू माळी, वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष धारू कोळी, युवा सेना जिल्हा सचिव दिनेश भोपे, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष राज पाटील, सोशल मीडिया जिल्हा समन्वयक आनंदा पाटील, गौतम मोरे व शिवसैनिक उपस्थित होते. अहमदाबाद येथील विमान दुर्घटना ही दुर्दैवी घटना आहे. यात निष्पाप लोकांच्या जीव गेला. परमेश्वर त्यांच्या मृतात्म्यास शांती देवो अशी प्रार्थना करण्यात आली.

# स्वतंत्र भिल्ल प्रदेशासाठी आदिवासी बांधवांचा एल्गार!

**प्रतिनिधी । नंदुरबार**

महाराष्ट्रासह गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान या चार राज्यातील आदिवासी बहुल जिल्हे जोडून स्वतंत्र भिल्ल प्रदेश स्थापन करण्यात यावा यासाठी आदिवासी टायगर सेनेच्या चारही राज्यातील कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन देवमोगरा (गुजरात) येथे एल्गार पुकारला. आदिवासींना खऱ्या अर्थाने न्याय मिळावा व त्यांची अस्मिता, संस्कृती टिकावी आणि विकासाची दारे खुली व्हावी यासाठी स्वतंत्र राज्य न झाल्यास आंदोलनाची व्यापकता वाढविण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.

आदिवासींसाठी स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. अधूनमधून ही चळवळ सुरू होते आणि पुन्हा थंडावते, असे आजवरचे चित्र आहे. आता पुन्हा ही मागणी घेऊन आदिवासी टायगर सेना अधिक आक्रमक झाली आहे. भिल्ल प्रदेश बनावसाठी महाराष्ट्र,



**● चार राज्यांतील कार्यकर्ते एकवटले: देवमोगरा येथे स्वतंत्र राज्य निर्मितीसाठी आदिवासी कार्यकर्त्यांचा मेळाव्यात संकल्प**

गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान या चार राज्यांतील कार्यकर्त्यांची एक स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली असून त्याअंतर्गत या बैठका सुरू झाल्या आहेत. यापूर्वी गुजरातमधीलच नानीनरोली येथे ही बैठक झाली होती. त्यानंतर आता आदिवासींचे कुलदैवत असलेल्या याहामोगी मातेच्या देवमोगरा या गावात घेण्यात आली. यावेळी चारही राज्यांतील सुमारे दोन हजारांपेक्षा अधिक कार्यकर्ते उपस्थित होते. यापुढील तिसरी बैठक आता महाराष्ट्रात घेण्याचा निर्णयही यावेळी झाला. तसेच विविध भागात याबाबत लोकजागृती करण्यासाठी बैठका व मेळावे घेण्यात येणार आहेत. मेळाव्यात नंदुरबार आणि धुळे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुहास नाईक, आदिवासी टायगर सेनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रविंद्र पाडवी, राष्ट्रीय प्रवक्ता अजय गावित तसेच अभियंता प्रविण पावरा, ॲड. प्रविण मोरे यांच्यासह मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते उपस्थित होते.

# झाड छाटनीच्या कारणावरुन पती-पत्नीस मारहाण

**प्रतिनिधी । नंदुरबार**

तालुक्यातील खामगाव येथील गोपाल सुपडया भिल व त्यांच्या पत्नीला मारहाण झाली. संशयीत हे त्यांच्या घरासमोर झाडाची छाटणी करीत असल्याच्या कारणातून वाद झाला.

यावेळी पाच जणांनी गोपालसुपडया भिल व त्यांच्या पत्नीला हाताबुक्यांनी मारहाण केली तसेच चारचाकी वाहनातून (क्र. जी. जे. एबी ३६३७) चार लोकांनी येवून त्यातील एकाने फायटरने डोक्यावर मारून गोपाल भिल यांना जखमी केले इर इतरांनी हाताबुक्यांनी मारहाण केली.

याबाबत गोपाल सुपड्या भिल यांनी नंदुरबार उपनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार गणेश रमेश पाडवी रा. कुकरकुंडा, निलेश रमेश पाडवी रा. पाचोराबारी, सागर फुलसिंग पाडवी, रमेश वाहरू पाडवी व एक जण रा. कुकरकुंडा अशा पाच जणांविरूध्द नंदुरबार उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास हे.कॉ. मनोज अहिरे करीत आहेत.

## पान १ वरुन

**इंद्रायणीवरील पूल कोसळून......**

त्याच्यासाठी वर्षभरापूर्वी निधीही मंजूर केल्याचे सरकार सांगत आहे. मग वर्षभर काम का झाले नाही? सरकार दुर्घटना होण्याची वाट पहात बसले होते का? त्या पुलावर पाटी लावली होती, असे प्रशासन सांगत आहे. पण अशा पाट्या लावून पाट्या टाकण्याचेच काम शासन व प्रशासन करत आहे. ५५ पर्यटक वाहून गेले, त्यातील अनेकांना वाचवण्यात आले आहे. पण ८ ते १० जण ठार झाले तर ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. याला जबाबदार कोण? जोपर्यंत कठोर शिक्षा होत नाही तोपर्यंत कोणीही गांभिर्याने घेणार नाही व अशा दुर्घटना होऊन निष्पाप लोक मात्र मरत राहतील. पूल दुर्घटनेनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व धोकादायक पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे निर्देश दिले आहेत.

**शाळेच्या पहिल्या दिवशी अजित......**

संगोपन केले पाहिजे. यामुळे लहानपणापासून विद्यार्थ्यांवर पर्यावरण विषयक संस्कार होण्यास मदत होईल या माध्यमातून पर्यावरणाचा समतोल साधण्याचा प्रयत्न आहे, असेही पवार म्हणाले. अजित पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तके आणि गणवेशाचे वाटप करण्यात आले. यावेळी आलेगावचे पुनवर्सनचे सरपंच नवनाथ झुंबर कदम, मुख्याध्यापिका अनिता खताळ, ग्रामसेवक अर्चना भागवत, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संभाजी कुतवळ आदी उपस्थित होते.

**'नाशिकसाठी जे करायचे......**

किती वाढेल, याचा माझा अभ्यास नसल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले. मी उद्धवसेना नाही. त्यामुळे त्यांच्या पक्षात कोण निर्णय घेते याची मला कल्पना नाही. मी होतो तेव्हा बाळासाहेब ठाकरे स्वतः निर्णय घेत. एकदा पक्षातून बाहेर पडल्यानंतर पुन्हा शिवसेनेत जाण्याचा माझा मुद्दाच नव्हता. मी तसा प्रयत्नही केला नाही, असे भुजबळांनी स्पष्ट केले. भुजबळ फार्म येथे त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. शिवसेनेत जे घडले त्याला रश्मी ठाकरेच कारणीभूत असल्याचा खळबळजनक दावा शिंदेंच्या शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले यांनी केला होता. याकडे भुजबळ यांचे लक्ष वेधण्यात आले. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची मागणी असली तरी आर्थिक निर्णय हे मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतले जातात, असे त्यांनी स्पष्ट केले.

**दर्शनापूर्वी गोदावरी नदीत......**

आरडाओरड करत वाचवण्याचा प्रयत्न केला. यामध्ये पाच तरुणांचा मृत्यू झाला, तर १३ जणांना स्थानिकांच्या आणि पोलिसांच्या मदतीने सुखरूप बाहेर काढण्यात आले. मृतदेह पोस्टमार्टमसाठी निर्मल येथील सरकारी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. राकेश, विनोद, मदन, रुतिक, भरत या सर्वांचे वय २० वर्षांपेक्षा कमी असून, ते हैदराबादच्या चिंतल बाजार येथील रहिवासी आणि मूळचे राजस्थानचे होते. या तरुणांच्या मृत्यूमुळे कुटुंबावर मोठा आघात झाला असून, स्थानिक समुदायात शोककळा पसरली आहे.

**आसिफ मुनीर यांना निमंत्रण......**

पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल आसिफ मुनीर यांना निमंत्रित करण्यात आल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्यामुळे भारतात तीव्र प्रतिक्रिया उमटली होती. अलिकडेच भारत आणि पाकिस्तानमध्ये ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतर झालेल्या लष्करी संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जनरल मुनीर यांना अमेरिकेचे निमंत्रण मिळाल्याची बातमी आल्यामुळे भारतातील काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी सरकारवर टीका करायला सुरुवात केली होती.

**इराणचे सर्वोच्च नेते अली......**

यांच्यातील संघर्ष तीव्रतेच्या टोकावर पोहोचला असताना समोर आले आहे. भारत - पाकिस्तान संघर्ष थांबवल्याचा दावा - दरम्यान, ट्रम्प यांनी इस्त्रायल आणि इराणला शांततेसाठी करार करण्याचं आवाहन केलं आहे. त्यांनी अपेक्षा व्यक्त केली की दोन्ही कट्टर विरोधक देश सामंजस्य करार करतील. ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष थांबवल्याचा दावा केला. त्यानुसार इस्त्रायल आणि इराण यांच्यामध्ये लवकरच शांतता प्रस्थापित होईल, काही बैठका आणि फोन कॉल होत आहेत, असं ट्रम्प म्हणाले.

## बोधकथा

### रामबाण औषध



एकदा एक सिंह आजारामुळे खूप दुबळा झाला. तेव्हा त्याची विचारणा करायला जंगलातील प्राणी, पक्षी येत-जात असत.. तेव्हा एक लांडगासुद्धा सिंहाच्या भेटीला तेथे आला. त्याने सिंहाची विचारपूस केली व सिंहाचे कान भरायला सुरुवात केली ती अशी. लांडगा सिंहाला म्हणाला, महाराज क्षमा असावी, पण एक गोष्ट विचारायचे धाडस करू काय? तेव्हा सिंहाने लांडग्याला लगेच परवानगी दिली व म्हणाला, विचार काय विचारायचे ते. तेव्हा लांडगा म्हणाला, महाराज आपल्या आजाराची विचारण करायला जंगलातील सर्व प्राणी आले पण...! पण काय.....? सिंह म्हणाला . महाराज या प्राण्यांमध्ये मला कोल्हा दिसला नाही . नाही मी सहज विचारलं या कोल्ह्याला महाराजांबद्दल बिलकुल आदर नाही, असे मला वाटते. नाहीतर तो एकदा तरी येऊन गेला असता. कोल्हा तेवढ्यातच तेथे येऊन उभा झाला. लांडग्याचे शेवटचे शब्द कोल्ह्याच्या कानावर पडले होते. तेव्हा कोल्हा शांतपणे म्हणाला, महाराजांनी एकदा माझे बोलणे शांतपणे ऐकून घ्यावे नंतर काय ते बोलावे. महाराज आजपर्यंत एवढे पशु आपल्या भेटीला आले, पण कोणी आपल्या आजाराचा उपाय शोधला ? या उपायासाठी मी आजपर्यंत खटपट करत होतो व ते औषध शोधल्यावरच मी आपल्याजवळ आलो. सिंह म्हणाला, सांग मग काय उपाय शोधला तू! महाराज औषध एकदम रामबाण शोधल आहे. सांग बाबा लवकर काय ते औषध आहे, सिंह म्हणाला. कोल्हा म्हनला ते औषध असे आहे की एका जिवंत लांडग्याचे कातडे सोलून ते गरम असतानाच तुम्ही अंगावर घेतले म्हणजे झाल. त्याच क्षणी लांडगा तेथे मारून पडला. कोल्हा म्हणाला, कोणाचे कान भरण्यापेक्षा त्यांच्यातला सद्भावना जागृत करणे केव्हाही उत्तम !

## राशिभविष्य

**मेष** : राशीसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला राहील. आरोग्य संबंधित समस्यांपासून सुटका मिळेल. व्यायाम आणि आहारावर लक्ष द्या.

**वृषभ** : आजचा तुमचा दिवस कार्यक्षेत्रात प्रगती घडवणारा असेल. तुमची सर्व थांबलेली कामे आज पूर्ण होऊ शकतात.

**मिथुन** : राशीसाठी आजचा दिवस आई-वडिलांच्या सेवेत जाईल. एखादी चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे.

**कर्क** : तुमचा दिवस आनंदात जाईल. कुटुंबातील वातावरण शांत राहील. आज तुम्ही तुमचा वेळ मुलांना शिकवण्यात घालवाल, ज्यामुळे मुलं आनंदी होतील.

**सिंह** : आजचा दिवस सिंह राशीसाठी तुमचा उत्तम राहील. कामाप्रती असलेल्या समर्पणामुळे तुम्ही लवकरच यशाकडे वाटचाल कराल.

**कन्या** : आज तुमचे मन उत्साहित राहील. नोकरी करणाऱ्या लोकांसाठी चांगल्या संधी मिळण्याची शक्यता आहे. त्यांच्या पगारात वाढ होईल.

**तुळ** : आजचा दिवस खूप चांगला राहील. पुस्तक विक्रेत्यांसाठी आजचा दिवस खूप फायदेशीर असेल. पुस्तकांची विक्री जास्त होईल. व्यावसायिक भागीदारासोबतचे तुमचे संबंध अधिक मजबूत होतील. आरोग्याच्या दृष्टीने तुम्हाला ताजेतवाने वाटेल. नवीन विवाहित जोडपे आज देवाच्या दर्शनासाठी मंदिरात जातील. कुटुंबासोबत जास्त वेळ घालवण्याची संधी मिळेल.

**वृश्चिक** : या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमचा उत्तम राहील. एखाद्या मित्राचे सहकार्य मिळेल. तुम्ही खूप आनंदी राहाल.

**धनु** : आज तुम्ही ज्याच्यावर प्रेम करता, त्याच्यासोबत आपल्या मनातील प्रत्येक गोष्ट मोकळेपणाने बोलू शकता. आज एखादे मोठे यश तुमच्या हाती लागू शकते.

**मकर** : राशीच्या लोकांचा दिवस चांगला राहील. तुमच्यासमोर कामासंबंधित आव्हान असेल. तुम्हाला नशिबाची पूर्ण साथ मिळेल.

**कुंभ** : राशीच्या व्यक्तींचे मन प्रसन्न राहील. ऑफिसच्या कामात तुम्ही व्यस्त राहाल. ज्यामुळे तुमचे बॉस तुमच्यावर खुश होतील.

**मीन** : राशीच्या लोकांना नवीन अनुभव मिळेल. आज थोड्या प्रयत्नाने तुम्हाला मोठा नफा होईल. खेळाशी संबंधित लोकांना आज त्यांच्या प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण दिले जाईल.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई -१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - राजेंद्र राधाकिसन शर्मा (मोबा. - ९४२२७८४३३६) (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com






जळगाव – १) शहरातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे औक्षण करतांना शिक्षीका २) अमळनेर तालुक्यातील जवखेडे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत खासदार स्मिता वाघ ३) जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी जामनेर तालुक्यातील भराडी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांना गणवेश व पाठ्यपुस्तके वितरित केली ४) मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी नांद्राबु. व पिलखेडे शाळांमध्ये गुलाबपुष्पांनी स्वागत के ले.

# १८६० शाळांमध्ये प्रवेशोत्सव जल्लोषात

**● विद्यार्थ्यांचे औक्षण, पुष्पगुच्छ व टाळ्याच्या गजरात स्वागत; खासदार, आमदार यांचा उत्स्फूर्त सहभाग**

**प्रतिनिधी । जळगाव**

**राज्य शासनाच्या शाळा प्रवेशोत्सव २०२५–२६ उपक्रमांतर्गत जळगाव जिल्ह्यातील १८६० जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगर परिषद शाळांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ १६ जून रोजी उत्साहात झाला. विद्यार्थ्यांचे औक्षण, पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. यावेळी आमदार, खासदार, जिल्हाधिकारी, जि.प.सीईओ, पोलिस अधिक्षक यांची उपस्थिती होती.**

सर्व शाळांमध्ये नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे औक्षण, पुष्पगुच्छ देऊन, टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. खा. स्मिता वाघ, आ. प्रा.चंद्रकांत सोनवणे, आ. अमोल चिमणराव पाटील, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, शिक्षक, पालक व शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांनीही या उपक्रमात सहभाग नोंदवत वातावरण आनंदमय केले.

अमळनेर तालुक्यातील जवखेडे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत खासदार स्मिता वाघ यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत झाले. गणवेश, शालेय साहित्य वाटप आणि वृक्षारोपण यासह पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. चोपड्याचे आमदार चंद्रकांत सोनवणे यांच्या उपस्थितीत अडावद कन्या व अडावद मुले शाळांमध्ये तर पारोळा तालुक्यातील कन्हेरे शाळेत आमदार अमोल चिमणराव पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत करून गणवेश पाठयपुस्तकं देण्यात आली.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी जामनेर तालुक्यातील भराडी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांना गणवेश व पाठ्यपुस्तके वितरित केली. मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी नांद्राबु. व पिलखेडे शाळांमध्ये गुलाबपुष्पांनी स्वागत करून पाठ्यपुस्तके वाटप केले. पिलखेड येथे ग्रंथ दिंडीचे आयोजनही करण्यात आले. भुसावळ येथे तहसीलदार नीता लबडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र पाटोळे यांनी शिरसोली प्र. बो. येथील शाळेला भेट दिली, नगर प्रशासनाचे सहायक आयुक्त जनार्दन पवार वडगाव लांबे (चाळीसगाव) शाळेत, तर सावदा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी भुषण वर्मा पी.एम. विष्णु हरी पाटील विद्यामंदिरात सहभागी झाले. चोपड्याचे मुख्याधिकारी राहुल पाटील व जामनेरचे विवेक धांडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुर्बान तडवी , उर्दू शाळा, चोपडा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा पवार, जिराळी, जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील विदगाव ता. जळगाव, नायब तहसीलदार रविंद्र उगले महिंदळे, मुख्याधिकारी रविंद्र लांडे



गिरड, निवासी नायब तहसीलदार सुधीर सोनवणे भडगाव शाळा क्र. २, जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक गारखेडे खु. आणि तहसीलदार विजय बनसोड, पाचोरा यांच्या सह जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी विविध शाळांना उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

**खुबचंद सागरमल प्राथमिक शाळा**

येथील मानवता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित खूबचंद सागरमल प्राथमिक शाळा शिवाजीनगर जळगाव येथे पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यार्थ्यांचे शाळेच्या पहिल्या दिवशी अत्यंत उत्साहात स्वागत करण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प, गणवेश, बूट–सॉक्स,वही–पेन, शालेय पुस्तके, दप्तर इत्यादी साहित्य भेट देण्यात आले शाळेत उत्साहाने आलेल्या चिमुकल्यांसाठी पुष्पवृष्टी करून गुलाब पुष्प देऊन सेल्फी पॉईंटवर सेल्फी काढून उत्साहाने आपला सेल्फी काढून घेऊन स्वागत करण्यात आले त्यानंतर विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारासोबत गोड पदार्थ, समोसा असा खाऊ देण्यात आला व अशा रीतीने उत्साहात प्रवेशोत्सव शाळेचे माननीय अध्यक्ष आशिष मलारा व शाळेचे मुख्याध्यापक निखिल जोगी यांच्या उपस्थितीत व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने कार्यक्रम आनंदायी वातावरणात झाला.

**शांताबाई लक्ष्मणराव खडके प्राथमिक विद्यामंदिर**

लेवा एज्युकेशन युनियन संचलित जळगाव येथे आज दिनांक १६ जून रोजी विद्यार्थिनींचा शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. विद्यार्थिनींच्या प्रवेशसाठी बलून ची कमान तसेच बलून चे शोभिवंत असे पिलर लावण्यात आले होते.

विद्यार्थिनींना पाटी बिस्कीटचा पुडा व गुलाब पुष्प देऊन तसेच औक्षण करून शाळेच्या मुख्याध्यापिका सौ अंजना सुरवाडे मॅडम यांनी विद्यार्थिनींचे स्वागत केले विद्यार्थिनींना आवड निर्माण व्हावी म्हणून पहिल्याच दिवशी शालेय पोषण आहार अंतर्गत योजनेतून विद्यार्थिनींना शिरा वाटप करण्यात आला कार्यक्रमाच्या प्रसंगी शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ स्वाती फिरके मॅडम तसेच पालक प्रतिनिधी व इतर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी हजर होते. प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती इरावती अहिरे मॅडम यांनी केले तर पाठ्यपुस्तक वितरणाचे सूत्र संचालन उमेश्वर सूर्यवंशी यांनी केले.

**शहरातील शाळांत उत्साह**

या शैक्षणिक वर्षात शाळा प्रवेशोत्सव हा उपक्रम राज्यभर उत्साहपुर्ण वातावरणात साजरा करण्याचे निर्देश शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी १२ मार्च २०२५ च्या शासन निर्णयान्वये दिले आहेत. या उपक्रमांतर्गत १६ जून २०२५ सोमवार रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी नवोगत विद्यार्थ्यांचे आनंददायी व उत्साहवर्धक स्वागत करुन शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्सवमय वातावरणात करण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले होते. याअनुषंगाने जळगाव महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमाच्या मनपा शाळांना आयुक्त, मनपा यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या नियोजनानुसार सर्व मनपा अधिकारी यांनी आज १६ जून २०२५ सोमवार रोजी शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमास उपस्थित राहून मार्गदर्शन केले. महानगरपालिका क्षेत्रातील शाळा प्रवेशोत्सव मुख्य कार्यक्रम ऑल इंडिया मेमन फेडरेशन जळगाव मनपा शाळा क्र. ११ व मनपा शाळा क्र.३२, ग्रांचे संयुक्त विद्यमाने आयोजीत करण्यात आलेला होता. या कार्यक्रमास जळगाव शहरी भागाचे आमदार सुरेश भोळे, आयुक्त, महानगरपालिका जळगाव ज्ञानेश्वर ढेरे, उपायुक्त, सा.प्र., निर्मला गायकवाड–पेबळे, प्रशासन अधिकारी खालील एम.शेख, ऑल इंडिया मेमन फाऊंडेशन चे जिल्हाध्यक्ष कादर मेमन, माजी नगरसेवक प्रशांत नाईक, मुख्याध्यापक रिजवान सर, संदिपकुमार बांगर, सर्व शिक्षक व विद्यार्थी पालक उपस्थित होते. या प्रवेशात्सवाचे प्रमुख आकर्षण इ.१ लीच्या सर्व नवोगत विद्यार्थ्यांना घोडचाच्या बग्गीमध्ये बसवून शाळेत आणण्यात येवून त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

तसेच सर्व नवोगत विद्यार्थी व इ.८ वी पर्यंतचे सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्य–पुस्तक, मोफत गणवेश, मोफत बुट व सॉक्स, स्कुल बॅग व शैक्षणिक साहित्य मान्यवरांचे हस्ते देण्यात आले. आमदार सुरेश भोळे,यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी क्रिडा क्षेत्रात पण लक्ष केंद्रीत करणे आवश्यक म्हणून शाळेमध्ये दररोज शारिरीक शिक्षणाचा तास घेण्यात यावे, तसेच मा.आयुक्त, मनपा जळगाव ज्ञानेश्वर ढेरे यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी सर्व शिक्षकांनी सातत्याने प्रयत्न करावे याबाबत मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रम सर्व मान्यवर, पालक व मुलांच्या उपस्थितीत आनंदपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

## कही खुशी, कही गम

१६ जून पासुन सर्वत्र शाळांना सुरूवात झाली आहे. विद्यार्थी उत्साहात आणि आनंदात नवीन वर्गात प्रवेश करीत होते. तर अनेक विद्यार्थ्यांचे नव्यानेच ॲडमिशन झाले असल्याने शाळेत जाण्यास नकार देत रडत असल्याचे चित्र शहरातील काही शाळांत पहावयास मिळाले. यावेळी पालक मुलांची समजूत काढत होते. तर अनेक जण शाळेतील खेळण्यांमध्ये मुलांना रमविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसुन आले.

## थोडक्यात

### विमान दुर्घटनेतील मृतांना पीआरपीतर्फे श्रद्धांजली

**जळगाव ।** अहमदाबाद विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या कुटुंबीयांना पाच कोटी रुपये मदत स्वरूपात मिळावे, अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टीतर्फे करण्यात आली आहे. पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या नेतृत्वात जळगाव जिल्ह्याचे अध्यक्ष राजू भाई, महानगर अध्यक्ष नारायण सपकाळे, जिल्हा उपाध्यक्ष शांताराम अहिरे यांनी मागणी केली आहे. या वेळी मृत पावलेल्या सर्व २६५ जणांना भारतीय जनता पार्टीच्या उपस्थित प्रमुख पदाधिकारी यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

### घोषवाक्य स्पर्धेत २५ पर्यंत सहभागाची संधी

**जळगाव ।** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत बोधचिन्ह आणि घोषवाक्य स्पर्धेचे जाहीर आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमार्फत कृषी विभागाच्या दृश्य ओळखीचा भाग ठरणाऱ्या नव्या बोधचिन्ह आणि प्रेरणादायी घोषवाक्याची निवड करण्यात येणार आहे. कोणतेही प्रवेश शुल्क नसलेल्या या स्पर्धेत एकाच स्पर्धकास दोन पर्याय सादर करता येणार आहे. तसेच तो दोन्ही श्रेणींमध्ये (लोगो आणि टॅगलाइन) सहभाग घेऊ शकतो. बोधचिन्ह स्पर्धेच्या विजेत्यास १ लाख तर घोषवाक्य स्पर्धेच्या विजेत्यास ५० हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहे. स्पर्धकांनी आपले प्रस्ताव ई–मेलद्वारे krushipublicity@gmail.com या पत्त्यावर २५ जूनपर्यंत पाठवावे असे कळवण्यात आले आहे. जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# वीजपुरवठा बंद केल्याने वायरमनला मारहाण

**प्रतिनिधी । जळगाव**

वीजपुरवठा बंद केल्याने आकोडे टाकणाऱ्या शिवाजीनगर हुडकोतील २५ ते ३० महिलांनी शनिवारी मध्यरात्री ऑन ड्यूटी असलेल्या दोन वायरमनला मारहाण केल्याची घटना समोर आली आहे.

या प्रकरणी रविवारी शहर पोलिस ठाण्यात अज्ञात महिलांविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल झाला. शनिवारी रात्री साडेअकरा ते पावणेबाराच्या दरम्यान ओव्हरलोड झाल्याने सुदर्शन सपकाळे व दीपक बडगुजर या दोन वायरमनने शिवाजीनगर हुडकोतील वीजपुरवठा खंडित केला. वीज बंद केल्याच्या रागातून २५–३० महिलांनी महावितरणचे सुदर्शन सपकाळे व दीपक बडगुजर या दोन वायरमनला मध्यरात्री मारहाण केली. शुक्रवारीही रात्रीच्या वेळी अशीच स्थिती निर्माण झाल्यावर मोठ्या प्रमाणावर महिलांनी महावितरणच्या शिवाजीनगर युनिटवरगोंधळ घातला होता. वायरमन सुदर्शन सपकाळे यांनी पोलिसांत तक्रार दिली असल्याची माहिती देण्यात आली. या घटनेमुळे परीसरात काळ वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# जिल्हा परिषद उर्दू कन्या शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

**प्रतिनिधी । जळगाव**

येथील जिल्हा परिषद उर्दू कन्या शाळा क्र.२, नशिराबाद येथे प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रभात फेरीने झाली.

विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत गावातून दींडी काढण्यात आली. शिक्षणाचे महत्त्व गावकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यावर यामधून भर देण्यात आला. नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. शाळेच्या वतीने मोफत



पाठ्यपुस्तके, गणवेश आणि बूट वाटप करण्यात आले. यानंतर उपस्थितांना गोड भाताचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमात पालक आणि शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मुख्याध्यापक सुलताना मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमजद खान आणि केंद्रप्रमुख मसूद यांची उपस्थिती होती.

शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. गेल्या दिड महिन्यापासुन शाळेला सुट्टी होती. आता १६ जून पासुन शाळांना पुन्हा सुरूवात झाली असून विद्यार्थ्यामध्ये आनंदी आणि उत्साहाचे वातावरण दिसुन आले. यावेळी पालक वर्ग देखिल मुलांना सोडण्यासाठी उपस्थित होते.

# सलग दुसऱ्या दिवशीही मुंबई फ्लाइट केली रद्द

**प्रतिनिधी । जळगाव**

अलायन्स एअरने शनिवारपाठोपाठ रविवारीही जळगाव–मुंबई फ्लाइट रद्द केली. तांत्रिक कारणाने फ्लाइट रद्द केल्याचे विमान कंपनीतर्फे सांगण्यात आले.

आठवड्यातून दोन दिवस शनिवार आणि रविवारी असणारी मुंबई–जळगाव व जळगाव–मुंबई विमानसेवा गेल्या महिन्यात चार वेळा रद्द झाली. तर जूनमध्ये यापूर्वी दोन वेळा रद्द झाली आहे. पुन्हा शनिवार, रविवारी तांत्रिक कारण देत कंपनीने फ्लाइट रद्द केली आहे. त्या तुलनेत फ्लाय ९१ या कंपनीतर्फे पुरवल्या जाणाऱ्या पुणे, गोवा, अहमदाबाद व हैदराबाद या विमानसेवा नियमित होती. फ्लाईट रद्द करण्यात आल्याने गैरसोय झाल्याचे प्रवाशांतून बोलले जात होते.

# प्रवाशांच्या हातावर काठीचा वार; मोबाईल लांबविण्याचा फंडा

**● रेल्वे परीसरात बालगुन्हेगार होताय मालामाल, प्रशासन मात्र अनभिज्ञ**

**प्रतिनिधी । जळगाव**

रेल्वे स्थानकाच्या परिसरात बालगुन्हेगारांचा चांगलाच धुमाकुळ सुरू आहे. रेल्वेने प्रवास करणाऱ्या तसेच दरवाजात बसुन मोबाईल पाहणाऱ्या प्रवाशांच्या हातावर काठी मारून मोबाईल लांबविण्याचा चांगला फंडा वापरला जात आहे. यामुळे प्रवाशांना मात्र नाहक आर्थिक भुर्दंड बसत आहे. या गंभीर समस्येकडे मात्र संबंधित विभागाचे सर्रास दुर्लक्ष होत आहे.



दरवाजात मोबाईल पाहणाऱ्या प्रवाशांच्या हाताला काठी मारून मोबाईल पडल्यावर घेऊन पसार होण्याचे प्रकार वाढल्यानंतर रेल्वे सुरक्षा बलाने याबाबत पाळत ठेवत दोन अल्पवयीनांना ताब्यात घेतले आहे. संशयीतांकडून ६५ हजारांच्या आयफोनसह हा मोबाईल जप्त केले आहेत. रेल्वे सुरक्षा बलाने कारवाई करत फटका प्रकरणात दोन सराईत बाल गुन्हेगारांना ताब्यात घेतले. चालत्या गाडीतून मोबाईल हिसकावण्याच्या प्रकारात हे दोघे सहभागी होते. १२ जून रोजी अमृतसर–बांद्रा एक्स्प्रेस (गाडी ११०५८) मध्ये प्रवास करत असलेल्या दानिश आबीद खान या प्रवाशाला दोघांनी लाकडी काठीने मारहाण करत त्याचा ६५ हजार रुपये किंमतीचा आयफोन हिसकावण्यात आला होता. अटक करण्यात आलेले दोघे जळगावमधील असून त्यांचे वय अनुक्रमे १५ व १६ वर्षे आहे. यापूर्वीही ते अशाच प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये अडकले होते. संपूर्ण मुद्देमाल आणि दोन्ही संशयीत मुलांना पुढील कारवाईसाठी लोहमार्ग पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले. लोहमार्ग पोलीस निरीक्षक सुधीर धायरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस तपास करीत आहे. रेल्वे पोलिसांच्या या कारवाईमुळे प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मोठा दिलासा मिळाला आहे.

दरम्यान अशा घटनांमुळे मात्र रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. बालगुन्हेगारीचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे.

# भक्तांनी पर्यावरण संवर्धनाची घेतली प्रतिज्ञा

**प्रतिनिधी । जळगाव**

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व गांधी रिसर्च फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण सप्ताहानिमित्त जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदुषणाचा अंतफ या थीमवर शिरसोली रोडवरील संत निरंकारी सत्संग भवनात कापडी पिशवी वाटप करण्यात आले. प्लास्टिक वापरामुळे होत असलेले दुष्परिणामाची जाणिव ठेऊन पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न करणार असल्याची प्रतिज्ञा सर्वांनी केली.

गांधी रिसर्च फाऊंडेशनचे मदन लाठी यांनी प्रतिज्ञा दिली. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ चे जळगाव विभागाचे उपप्रादेशिक अधिकारी




करणसिंग राजपूत यांनी कापडी पिशवीचा जास्तीत जास्त वापर कसा होईल याबाबतचे महत्त्व सांगितले. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ क्षेत्र अधिकारी राजेंद्र सूर्यवंशी, गांधी रिसर्च फाऊंडेशनचे उदय महाजन, विक्रम अस्वार, सुधीर पाटील, जळगाव येथील निरंकारी सस्तंग भवनाचे महात्मा रमेश कुमार आहुजा, राजकुमार वाणी, जळगाव शाखेचे सेवादल संचालक गंगाधर जोशी, व्ही एस निकम सर्व सेवादलाचे अधिकारी, महात्मा बहने सोबत साधसत्संग चे महात्मा बंधु व भगिनींसह सुमारे ५०० जणांचा सहभाग होता.

# आपला जिल्हा



# आगामी निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे

## ● शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीसाठी आयोजित बैठकीत आ.चंद्रकांत सोनवणे यांचा पक्ष पदाधिकाऱ्यांना सल्ला

**प्रतिनिधी । चोपडा**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगूल वाजल्याने शिवसेनेची(शिंदे गट) पक्ष संघटनात्मक सदस्य नोंदणीविषयी येथील बोथरा मंगल कार्यालयात दि.१७ जून रोजी आयोजित बैठकीत शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांना आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी यावल- चोपडा तालुक्यातील पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.



### ● सदस्य नोंदणी करा: आ.सोनवणे

**स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचा बिगूल वाजल्याने शिवसेना(शिंदे गट) पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी पक्षबांधणीसह पक्षाची संघटनात्मक सदस्य नोंदणीस वेग द्यावा, असे आवाहन आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांनी चोपडा येथील बोथरा मंगल कार्यालयात शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या संघटनात्मक बांधणीसाठी आयोजित बैठकीत केले. यावेळी चोपडा–यावल तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

येथील बोथरा मंगल कार्यालयात आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुका व संघटनात्मक पक्ष बांधणी सदस्य नोंदणी करण्यासंदर्भात चोपडा व यावल तालुका शिवसेना पक्षाची महत्वाची बैठक आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे व माजी आमदार लताताई चंद्रकांत सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

यावेळी आमदार प्रा.चंद्रकांत सोनवणे यांनी कार्यकर्त्यांना आगामी होऊ घातलेल्या निवडणुका व शिवसेना पक्ष संघटनात्मक सदस्य नोंदणीविषयी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी माजी आमदार सौ. लताताई सोनवणे, कृ.उ.बा सभापती नरेंद्र पाटील चोपडा, कृ.उ.बा उपसभापती बबलु कोळी यावल, कृ.उ.बा माजी सभापती मुन्ना पाटील यावल, सागरभाऊ ओतारी, माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष साळुंखे चिंचोली, माजी.उपसभापती प.स माणिक महाजन, प्रताप पाटील , प्रकाश रजाळे, भबुत चौधरी, रावसाहेब पाटील संचालक गोपाल पाटील संचालक, ॲड. शिवराज पाटील संचालक, सूर्यभान पाटील सर यावल कृ.उ.बा संचालक, विजय पाटील संचालक, किरण देवराज संचालक, कल्पनाताई पाटील संचालक, मंगलाताई पाटील, हरिष पाटील, एम. व्ही. पाटील, माजी उपसभापती पं.स. नामदेव पाटील, विकास पाटील, राजेंद्र पाटील माजी शिवसेना तालुकाप्रमुख, किशोर चौधरी माजी. उपनगराध्यक्ष, मेहमुद बागवान माजी. उपनगराध्यक्ष, हनीफ सत्तार प्रकाश राजपूत मा नगरसेवक, संध्याताई महाजन माजी नगरसेविका, महेंद्र धनगर माजी नगरसेवक , अनिता शिरसाठ , भावना महाजन, भारती महाजन , शीतल देवराज , दीपक चौधरी, गोपाल चौधरी, राजेंद्र पाटील, भरत चौधरी ,किरण पाटील, कैलास बाविस्कर, महेंद्र माळी, संतोष महाजन, शालिक महाजन, सोनू महाजन, सुनिल बरडिया, प्रविण देशमुख, विपीन जैन, निवृत्ती पाटील, प्रविण जैन, रमजान तडवी, धिरज गुजराथी, नंदू गवळी, दिव्यांक सावंत, गोलू मराठे, महेंद्र पाटील, भरत साळुंखे यांच्यासह यावल - चोपडा तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते हे उपस्थित होते.





## थोडक्यात

### लग्नातूनच दोन अल्पवयीन मुलींना पळवले

**अमळनेर ।** तालुक्यातील बहादरवाडी येथील लग्नातून दोन अल्पवयीन मुलींना फुस लावून पळवल्याची घटना १० रोजी घडली असून याप्रकरणी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १० रोजी त्यांच्या पुतण्याचे लग्न असल्याने ते लग्न कार्यात मग्न असताना फिर्यादीची १४ वर्ष १ महिना वय असलेली मुलगी व १५ वर्ष ८ महिने वय असलेली तिची मैत्रीण आम्ही नवरदेवजवळ पारावर जातो म्हणून बाहेर पडल्या. मात्र ३ वाजता लग्न लागल्यानंतरही त्या दिसून आल्या नाहीत. त्यामुळे दोन्ही मुलींच्या आईवडिलांनी आजूबाजूच्या गावात व आपापल्या नातेवाईकांकडे शोध घेतला. मात्र कोणताही तपास न लागल्याने त्यांना कोणीतरी फूस लावून पळवून नेल्याची खात्री झाली. त्यामुळे त्यांनी अमळनेर पोलिसांत धाव घेतली. त्यांच्या तक्रारीवरून अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

### हिंगोणे येथे वीज पडून म्हैस ठार

**अमळनेर ।** तालुक्यातील हिंगोणे बु. येथे वीज पडून गोठ्यात बांधलेली म्हैस ठार झाल्याची घटना दि.१२ रोजी घडली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, तालुक्यातील हिंगोणे बु. येथील शेतकरी प्रवीण मखमल पाटील यांची ७५ हजार रुपयांची गाभण असलेली म्हैस गोठ्यात बांधलेली होती. दि.१२ रोजी रात्री आलेल्या वादळात रात्री ९:३० वाजता वीज पडल्याने म्हशीचा मृत्यू झाला. दि.१३ रोजी तलाठी प्रशांत पवार व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. लवकरात लवकर मदत मिळावी, अशी मागणी शेतकऱ्याने केली आहे.

## एरंडोलमधील १० गावे ४८ तासांपासून अंधारात

**प्रतिनिधी । एरंडोल**

तालुक्यातील रिंगणगाव, खंजे बु, खंजे खु., खर्ची बु., खर्ची खु., खेडी, कढोली यांसह १० गावांमध्ये बुधवारी रात्री झालेल्या वादळी पावसामुळे ५० तास लटूनही वीजपुरवठा खंडित असल्यामुळे काळोखाचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. वादळी पावसामुळे तालुक्यातील रिंगणगाव वीज उपकेंद्रावरून वीजपुरवठा कोलमडला. ५० तासांपेक्षा अधिक काळ उलटूनही १० गावांमध्ये वीज वितरण व्यवस्था पूर्वपदावर आली नाही. त्यामुळे बँकांचे व्यवहार व मोबाईल चार्जिंग इतर सेवा ठप्प झाल्या. पाण्यासाठी परिसरातील लोकांना हातपंपावर धाव घ्यावी लागत आहे.

## 'मी तुमच्या कामांसाठीच झालो आमदार': अमोल जावळे

**प्रतिनिधी । रावेर**

तालुका मतदारसंघाचे आमदार अमोल जावळे यांनी गेल्या पाच ते सहा महिन्यांपासून रावेर मतदारसंघात प्रत्येक गाव खेड्यात जाऊन 'मला काम सांगा मी तुमच्या कामासाठी आमदार झालो आहे' असे सांगुन मतदारसंघातील नागरिकांच्या अडीअडचणी सोडवत आहेत.

सविस्तर वृत्त असे की, रावेर मतदारसंघातील अनेक वर्षापासून रेंगाळलेली कामे व ग्रामस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी कोणालाही वेळ नव्हता. मात्र आ.अमोल जावळे यांनी मतदारसंघातील प्रत्येक गाव, खेड्यात जाऊन ग्रामस्थांशी आस्थेवाईक चर्चा करून गावासाठी विकास कामे कोणत्या प्रकारचे हवेत याची माहिती द्या मी ती कामे करण्यासाठी अहोरात्र तयार आहे. आ.



अमोल जावळे यांनी मतदारसंघातील भाजपाच्या जबाबदार कार्यकर्त्यांना सूचना दिल्या आहेत. प्रत्येक गावात जाऊन ग्रामस्थांच्या अडीअडचणी समजून घ्या. त्या सोडवण्याकामी आपण सर्वांनी सहकार्य करावे, अशी विनंती केली आहे. आपुलकी दिसून आली.

**विरोधकांकडून चर्चेला उधाण!!!**

मतदारसंघात विकासकामे झाले नाही. आदिवासी परिसरात रस्ते नाही. पाल येथील झुलत्या पुलाची दयनीय अवस्था, शहरात झालेल्या अतिक्रमण त्याचबरोबर न.पा.काढून विकासकामे ठप्प, यासह अनेक बाबींवर विरोधक चर्चा करीत असल्याची सुज्ञ नागरिकांना समजले. मात्र गेल्या ४० वर्षापासून किती विकासकामे झाली व किती बेरोजगार तरुणांना रोजगार मिळाला? त्याचबरोबर सर्वसामान्यांच्या आरोग्याकडे किती लक्ष दिले? रावेरला मंजूर झालेली अत्याधुनिक रुग्णवाहिका रद्द कोणी केली? याबाबीकडे विरोधक डोळेझाक करीत असल्याचेही बोलले जात आहे. ४० वर्षात जी कामे झाली नाहीत, ती चार महिन्यात कशी होणार? यावर विरोधकांना मंथन करण्याची अत्यंत गरज आहे.

आ.अमोल जावळे हे सत्तेत असून सातत्याने जनतेच्या कामासाठी मतदारसंघात कार्यकर्त्यांसह जाऊन शेतकऱ्यांची व गोरगरीब जनतेच्या समस्यांची व बेघर लोकांच्या अडीअडचणी समजून घेत आहेत.

## कबड्डी स्पर्धेच्या कर्णधारपदी जान्हवी पाटील

**प्रतिनिधी । एरंडोल**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन पुणे येथे १४ ते १८ जूनदरम्यान आयोजित केलेल्या पहिल्या कुमार, कुमारी (१८ वर्षांखालील) राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी जळगाव जिल्हा संघ १३ जून रोजी रवाना झाला. गेल्या १० दिवसांपासून संघांचे सराव शिबिर ॲड. एस. ए. बाहेती महाविद्यालय, जळगाव येथे सुरु होते.

जळगाव येथे झालेल्या पहिल्या कुमार, कुमारी गट स्पर्धेतून प्रथम संभाव्य २२ खेळाडूंची निवड झाल्यानंतर निवड समिती सदस्य प्रा. हरीश शेळके व कमलेश पाटील यांनी त्यातील अंतिम १४ खेळाडूंची निवड करून जिल्हा संघ १३ जूनला रवाना झाला.

## पूर्णाड येथे वीज पडून शेतकऱ्याचा मृत्यू

**प्रतिनिधी । मुक्ताईनगर**

तालुक्यातील पूर्णाड गावात शनिवार दि.१४ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजेच्या सुमारास ४४ वर्षीय शेतकरी शांताराम शंकर कठोरे यांचा शेतात काम करत असताना वीज पडून जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. यामुळे पूर्णाड परिसरावर शोककळा पसरली आहे.

शांताराम कठोरे हे शेतकरी नेहमीप्रमाणे शेतात कामासाठी गेले होते. त्यानंतर सायंकाळी अचानक जोरदार वाऱ्याची झुळूक सुरू झाली. काही क्षणांतच विजांचा कडकडाट होताच, एक प्रचंड वीज शेतात कोसळली आणि ती थेट शांताराम कठोरे यांच्या अंगावर आदळली. हा धक्का इतका जबरदस्त होता की कठोरे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. काही वेळातच शेजारील शेतकऱ्यांनी ही घटना पाहून आरडाओरड केली. ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. कठोरे यांच्या मृतदेहाजवळ हतबद्ध होऊन उभे असलेल्या गावकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू दाटून आले.

**गावात पसरली शोककळा**

या घटनेमुळे संपूर्ण पूर्णाड गावात शोककळा पसरली आहे. कुटुंबातील कर्ता पुरुष गेल्याने कठोरे यांची पत्नी, दोन मुले आणि वृद्ध आई–वडिलांवर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यांचे कुटुंब आर्थिकदृष्ट्याही सक्षम नाही.

## सी.बी निकुंभ विद्यालयात विद्यार्थी प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

**प्रतिनिधी । चोपडा**

घोडगांव येथील नूतन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सी.बी निकुंभ माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, एस.एन.आर.जी.इंग्लिश मीडियम स्कूल या शाखांचा विद्यार्थी प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

सन- २०२५-२६ शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली असून या निमित्ताने शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सवासाठी रांगोळी,फुलांची रंगीबेरंगी फुग्यांची सजावट करून जय्यत तयारी करण्यात आली. याप्रसंगी इंग्लिश मीडियम स्कूलचे सर्व विद्यार्थी, इ.५ वी वर्गातील नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांवर



फुलांची उधळण करून त्यांचे गुलाबपुष्पाने स्वागत करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष द्रविलाल पाटील, सचिव जवरीलाल जैन,सहसचिव भानुदास पाटील,मदन पाटील, मुख्याध्यापक व्ही.ए.नागपुरे, इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य जेनिफर साळुंखे,आर.एम.चौधरी, व्ही.पी.पाटील तसेच पालक वर्ग उपस्थित होते. यावेळी इ.५ वी ते ८ वी वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण विभागाच्या मोफत पाठ्यपुस्तक योजनेअंतर्गत पाठ्यपुस्तकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक व्ही.ए.नागपुरे यांनी अध्ययनात विद्यार्थ्यांनी प्रगती करावी असा संदेश दिला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष चंद्रहासभाई गुजराथी व संचालक मंडळ सदस्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रवेशोत्सवाचा आगळावेगळा आनंद साजरा करण्यासाठी विद्यार्थ्यांना मिठाईवाटप करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जे.ए. पाठक यांनी केले.याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# चोपड्यात ढोल-ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांचे औक्षण; गुलाबपुष्प देऊन केले जल्लोषात स्वागत

## ● नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली उत्साहात अन् आनंदात

**प्रतिनिधी । चोपडा**

**येथे पालिका शाळांसह जिल्हा परिषद शाळेत पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे ढोल–ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांचे काही शाळांत औक्षण तर काही शाळेत शालेय गणवेश, पुस्तके, बुट आदी मोफत वाटप करण्यात आले. यामुळे प्रथम प्रवेशित काही विद्यार्थी आनंदित तर काही रडतांना दिसत होते.**




**● नवोगतसह सर्व विद्यार्थ्यांनी विद्येची देवता मां सरस्वती, स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीमाई फुले व यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्प अर्पण करुन शाळेत प्रवेश केला.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस व शालेय शिक्षण मंत्री यांच्या आदेशाने शाळा म्हणजे ज्ञानाचं मंदिर! शाळा प्रवेशोत्सव २०२५-२६. मोफत पाठ्यपुस्तक व गणवेश वाटपासह गुलाबपुष्प, तोरण, रांगोळी आणि स्वागत समारंभप्रत्येक विद्यार्थ्यांचे आनंददायी स्वागत मंत्री, लोकप्रतिनिधी, अधिकारी पालक व शिक्षकांचा सक्रीय सहभाग शिक्षणाची गंगा घराघरात पोहोचवण्याचा संकल्प करण्यात आला आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी आपल्या चोपड्यातील खासगी संस्थांसह जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशोत्सव ढोल -ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांचे औक्षण व गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यात अमर संस्था संचलित बालमोहन विद्यालय, एज्युकेशन सोसायटी संचलित प्रताप विद्यामंदिर, महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित महिला मंडळ हायस्कूल, विवेकानंद विद्यालय, भगनी मंडळ संचालित महिला मंडळ हायस्कूल, पंकज शैक्षणिक संस्थेचे पंकज महाविद्यालय यांच्यासह चोपड्यातील विविध शैक्षणिक संस्था, माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ची सुरुवात अतिशय उत्साही वातावरणात करण्यात आली.आकर्षक असे प्रवेशद्वार, शालेय परिसराची सजावट, ढोल–ताशांचा गजर, प्रवेशद्वारावर सर्व शिक्षिका, शिक्षक, कर्मचारी वृंदांनी औक्षण आणि फुलांसह होणारे स्वागत, मिळालेली नवी कोरी पुस्तके आणि खाऊ यामुळे नवीन प्रवेशित विद्यार्थी भारावले व शाळेच्या वातावरणात रंगल्याचे चित्र पहिल्याच दिवशी दिसून आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

